दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
VADAL VARTA
vadalvartanews@gmail.com
●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७
● बीड/महाराष्ट्र ● गुरुवार २७ जून २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक ३१९ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये

# चोरांमुळे झाले नदीपात्र स्वच्छ, बीडच्या करपरा नदीने घेतला मोकळा श्वास, नेमकं काय घडलं?

**अखेर नागरिकांनी प्रत्येकी 200 रुपये वर्गणी गोळा करून तब्बल 1 किलोमीटरचे नदीपात्र पोकलेंडमशीन लावून स्वच्छ केले आहे. तसेच उर्वरित दीड किलोमीटरचा नदीपात्रचा परिसरही स्वच्छ केला जाणार आहे. त्यामुळे काट्याकूट्या आणि झाडाझुडपांनी वेढा घातलेली करपरा नदी मोकळा श्वास घेणार आहे. नदीपात्रात रात्री चोरटे लपून बसून चोरी करतात. त्यामुळे नदीपात्र स्वच्छ करण्याची मोहीम हाती घेतली असल्याचं नागरिक सांगत आहेत. चोरांच्या भीतीपोटी बीड शहरातील करपरा नदी पात्र नागरिकांनी स्वखर्चाने लोकवर्गणी गोळा करून स्वच्छ केले. त्यामुळे नागरिकांनी प्रशासनाचे नाही तर चोरांचे आभार मानले आहेत.**




**बीड/प्रतिनिधी**

सर्वसामान्य माणसं वेळ पडली तर काहीही करु शकतात, हे त्रिकालबाधित सत्य आहे. सर्वसामान्य नागरिकांच्या आयुष्यात खूप संघर्ष असतो. कधी कुटुंबात, कधी कामाच्या ठिकाणी, कधी प्रवासात, कधी रस्त्यावर, कधी इथे तर कधी तिथे असे नानाविध समस्या असतात. या समस्यांनी सर्वसामान्य नागरिक हे अक्षरश: वेढलेले आहेत. विशेष म्हणजे या सर्वसामान्य नागरिकांच्या सामाजिक समस्या सोडवण्याची जबाबदारी ही प्रशासन आणि सरकारची आहे, हे देखील तितकंच खरं आहे. पण सर्वसामान्यांसाठी वेळप्रसंगी प्रशासन आणि सरकार तातडीने धावून जाणं हे क्वचितच घडतं. गेल्या काही दिवसांपासून बीड शहरातील जनता चोरांमुळे प्रचंड त्रस्त होती. या चोरांनी अनेकांना लुबाडलं आहे. अनेकांच्या घरांमध्ये चोरी केली. घरफोडीच्या घटनांमुळे सर्वसामान्य नागरीक मेटाकुटीला आले. या चोरांना करपरा नदीतील काटेरी झुडपे, पालापाचोळा आणि वेलींची चांगलीच साथ मिळत होती. नदीतील घाणीमुळे चोरांना लपण्यासाठी चांगलीच सोयीस्कर जागा मिळाली होती. विशेष म्हणजे याच चोरांमुळे आता नदीपात्र स्वच्छ झालं आहे. त्यामुळे बीडच्या करपरा नदीने मोकळा श्वास घेतला आहे.



**बीड-** आरक्षणाचे जनक छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त वंचित बहुजन आघाडी बीड जिल्ह्याच्या वतीने अभिवादन कार्यक्रम घेण्यात आला याप्रसंगी वंचित चे नेते डॉ. नितिन सोनवणे,वंचितच्या महिला जिल्हाध्यक्षा एड.अनिता चक्रे सहसचिव पुरुषोत्तम वीर, युनुस शेख, बालाजी जगतकर, शहराध्यक्ष लखन काका जोगदंड, किशोर भोले, सुवर्णा मस्के,अमोल मस्के आदी उपस्थित होते.

## महादेव मंदिर संत ज्ञानेश्वर मंदिर हानुमान मंदिर लोहगाव येथून शेकडोभाविकासह दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान...

**नांदेड/प्रतिनिधी**

नांदेडच्या बिलोली तालुक्यातील लोहगाव येथील अमृदंगाचार्य तथा गायक वारकरी श्री राजेंद्र भुमन्ना तोटावाड यांच्या मार्गदर्शनाखाली आज दिनांक २६ जून रोजी लोहगाव येथील महादेव मंदिर हनुमान मंदिर येथून दर्शन घेऊन दिंडीच पंढरपूरकडे प्रस्थान झालं सुरुवातीला महादेव मंदिर येथील श्री संत ज्ञानेश्वर मंदिर महाराज व शंभू महादेवाचे दर्शन व आरती करून भाविकांनी टाळ मृदंगाच्या निणतात वाजत गाजत मारुती मंदिराकडे जाऊन हनुमंत रायाचे दर्शन व आरती करून शेकडो महिला व पुरुष भक्त व टाळकरी माळकरी साधुसंत महंत कीर्तनकार प्रवचनकार यासह भाविक श्री राजेन्द्र भुमन्ना तोटावाड यांच्या शुभहस्ते नारळ फोडून दिंडीचे पंढरपूरकडे प्रस्थान झाले पंढरपूर येथे जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेऊन श्रीक्षेत्र देवू आळंदी येथे जाऊन येथील सिद्धेश्वर संत ज्ञानेश्वर देऊ येथील संत तुकाराम महाराज



यांचे दर्शन घेऊ परत आळंदी येथून पायी वारी आळंदी येथून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या यांच्या रथा मागे आषाढी एकादशी पर्यंत पंढरपूरला पोहोचणार व विठ्ठलाचे दर्शन घेणार अशी ही अभूतपूर्व दिंडी सोहळा प्रथमच लोहगाव येथून शेकडो भाविकांच्या उपस्थितीत प्रस्थान झालं यावेळी मृदंगाचार्य गायक वारकरी राजेंद्र भुमन्ना तोटावाड रेड्डी लोहगावकर श्री बाबुराव पाटील चिंचोले, भगवान पाटील कानोले, शंकर वानोळे, भीमराव मोंडेवाड, गंगाधर सुरेवाड, नागनाथ गालावर, बालाजी वानोळे, गुड्डू काचमोडे, भीमराव इज्जपतवार, हारके सर, भगवान पाटील, हांडे बाबुराव, बाबू देशमुख भंडारी मोहन मारावार यासह शकलो वारकरी भाविक भक्त दिंडीत सहभागी झाले तर दिंडीला शुभेच्छा व नारळ फोडून भगवा झेंडा दाखवून माझी चेअरमन श्री नागोराव नाईनवाट श्री दत्ता पाटील पांढरे विठ्ठल देशमुख लक्ष्मण महाराज युवा उद्योजक पिराजी अनंतवाड बालाजी देशमुख या गावातील नागरिक प्रमुख मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते .



## राजर्षी छत्रपती शाहु महाराजांना अभिवादन...

**बीड/प्रतिनिधी**

महाविहार धम्मभूमी डॉ.भदन्त आनंद कौसल्यायन नगर शिवणी ता.जि.बीड येथे प्रियदर्शी धम्मसंस्कार शिक्षण संस्था बीडच्या वतीने राजर्षी छत्रपती शाहु महाराज यांना १५० व्या जयंतीच्या अनुषंगाने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी पु.भिक्खु धम्मशील थेरो,इंजि.भिमज्ञ वेडे,फौजी अंकुश नाना डोळस,ॲड. विजय पंडीत,भास्कर सरपते,बाबु डोळस,शिवाजी डोंगरे,जालींदर जाधव,बाबासाहेब निकाळजे आदिंची उपस्थिती होती.

## 'त्यांनी आरशात आपला चेहरा पाहावा', देवेंद्र फडणवीस इतके का संतापले?

विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाआधी आज चहापानाचा कार्यक्रम पार पडला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रथेनुसार, विरोधकांना चहापानाच्या कार्यक्रमाचं निमंत्रण दिलं. पण विरोधकांनी चहापानाच्या कार्यक्रमावर बहिष्कार टाकला. याउलट त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र पाठवत सरकारला विविध मुद्यांवरुन घेरण्याचा प्रयत्न केला. संबंधित पत्रात मांडलेल्या मुद्यांवर आधी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी संताप व्यक्त केला. त्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर निशाणा साधला. विरोधकांनी पत्रात मांडलेल्या मुद्यांवरुन उद्यापासून सुरु होणाऱ्या अधिवेशनात घमासान होण्याची शक्यता आहे. त्याआधीच देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांवर जोरदार घणाघात केला.

## शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी प्रत्यक्ष जिल्हा परिषदेत न येता पत्रव्यवहार ई-मेलवरून करा



**अंबाजोगाई/परवेज पटेल**

उन्हाळी सुट्टीनंतर शैक्षणिक क्षेत्राच्या नवीन वर्षाची सुरुवात नुकतीच झाली. या अनुषंगाने बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांनी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी पत्रव्यवहार प्रत्यक्ष जिल्हा परिषदेत न चतवार मेल वरून करावा असे आदेश निर्गमित केले आहे. बीड जिल्हा परिषदेअंतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, केंद्रीय प्राथमिक शाळा, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, गटशिक्षणाधिकारी कार्यालय व शिक्षणाधिकारी प्राथमिक कार्यालय यांच्यामध्ये होणारा पत्रव्यवहार इलेक्ट्रॉनिक स्वरूपात करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश पाठक यांनी दिनांक १८ जून २०२४ रोजी दिले आहेत. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा यांचा पत्र व्यवहार केंद्रीय प्राथमिक शाळेला करतात व तेथून हा पत्र व्यवहार शिक्षणाधिकारी कार्यालयात होतो. पत्रव्यवहार करण्यासाठी अनेकदा कार्यालयीन कर्मचारी अथवा परिचर उपलब्ध नसल्याने कार्यरत असणारे शिक्षक या पत्रव्यवहारासाठी मुख्यालय सोडतात. होते. अनेकदा अशी कामे दाखवून विनाकारण मुख्यालय सोडून दांडी मारतात. हे टाळण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, गट शिक्षणाधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्यातील सर्व पत्र व्यवहार यापुढे इलेक्ट्रॉनिक माध्यमातून करण्याचे निर्देशित करण्यात आले आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टळणार कार्यकारी अधिकारी पाठक यांनी म्हटले आहे.

कविता

## जीवन

कोणता दिवस असेल
किंवा असेल तो क्षण
अखेरचा ठरणार डाव
थांबेल तिथेच जीवन..

खूप काही ठरवलेले
राहील तसेच्या तसे
अर्ध्यावर मोडेल डाव
वाटले कधी कुठे असे..

नसतं आपल्या हातात
कितीही ठरवलं जरी
सारं बिघडतं गणित
सूत्र मांडली योग्य तरी..

स्वत:वरचा विश्वास सुद्धा
तेव्हा पडतो कमी
सर्व काही माझ्या हातात
होती याची दृढ हमी..

शहाणं व्हावं आता तरी
समजून घ्यावी ही खेळी
जाण्याआधी जगा असं
यावं वाटे पुढच्या वेळी..

सुचित्रा कुंचमवार
नवी मुंबई

# आदिवासी भागात पहिला साजरा होणारा कोवळी भाजी सण उत्साहात साजरा

**पालघर/सौरभ कामडी**

पालघर जिल्ह्यातील आदिवासी बहुल जव्हार तालुक्यातील आदिवासी भागात सर्वात पहिला येणारा सण हा कोवळी भाजीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करतात ,नवीन पाण्याची नवीन मोड आणि पावसाळ्याची सुरुवात याचा आनंद व्यक्त करण्यासाठी शेतकरी आपल्या पिकांची पेरणी पूर्ण झाल्यावर व पाऊस पडल्यानंतर जंगलात सर्वात पहिली राणभाजी उगवते ती भाजी जंगलात जावून घेवून येतात. व गावातील गावदेवता,निसर्ग देवता यांना गावातील पुजारी शेंदूर



लावतात व देवाला विनवती करून मोठ्या उत्साहात हा सण साजरा केला जातो.

हा सण केलेंडरप्रमाणे एखाद्या विशिष्ट तिथीलाच येतो असे नाही .तर पाऊस पडल्यानंतर कवळी भाजी रानात उगवली का हे पाहून गावातील ज्येष्ठ नागरिक एकत्र येवून एक वार निश्चित करतात .जंगलातील भाजी ही दिवसा जावून घरी आणल्यानंतर गावाच्या गावदेवीजवळ थोडीशी भाजी ठेवून नंतर संध्याकाळी प्रत्येक घरोघरी शिजवली जाते त्यांनतर कुलदौवतासाठी निवद ( नैवद्य )ठेवून नंतर घरातील लेकी बाळीसह सगळेजण जेवायला बसतात.या सणाला नवीन लग्न होवून सासरी गेलेल्या पोरी आवर्जुन माहेरी आणल्या जातात.

कवळी भाजी ही बलवर्धक ,रोगप्रतिकार शक्तीत वाढ करणारी,मेंदू सतेज ठेवणारी व स्त्रीयांच्या गर्भाशयातील विकार दूर करणारी आहे.असे जुणी जाणती माणसे म्हणातात.या सणाच्या दिवशी आदिवासी पाड्यावर संध्याकाळी माणसे तारपा नाच, कांबड नाच,ढोलनाच पोरं पोरी पुरुष स्त्रीया अगदी म्हातारी माणसे देखील तालासुरात नाचतात व सगळ्यांच्या चेहऱ्यावर खूप उत्साह असायचा.

# मनसे चे रस्त्यासाठी सरण रचो आंदोलन

## रस्त्याचे काम तत्काळ सुरू करावे, नसत मनसे स्टाईल आंदोलन

**बीड/प्रतिनिधी**

बीड शहरात बऱ्याच भागात रस्त्यावर खड्डे पडल्याने शहरवासीय वैतागले असून याकडे नगर पालिकेकडून जानीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप मनसे चे शहर अध्यक्ष करण लोंढे यांनी केला आहे. शहरातील संत सावतामाळी चौक, जिजामाता चौक, अमरधाम स्मशानभूमी ते जुना मोंढा जोडणाऱ्या या रस्त्यावर कित्येक वर्षापासून खड्डे



पडले पुलावरील गज देखील उघडे असून अपघात होवून गंभीर दुखापत होण्याची शक्यता आहे. यापूर्वीही आंदोलन झाली होती परंतु जाणीवपूर्वक हा रस्ता केला जात नसल्याने आज मनसे कडून सरण रचो आंदोलन करण्यात आले. यानंतर चे आंदोलन हे मनसे स्टाईल होईल असा इशारा दिला. यावेळी शहराध्यक्ष करण लोंढे, राज्य उपाध्यक्ष वर्षाताई जगदाळे, उपाध्यक्ष कुणाल उगले, सचिव सोमेश कदम, हिराबाई कांबळे, ओम पारवे, प्रतिक लोळगे सह मनसैनिक उपस्थित होते.

# परसातील पडवळांचे मांडव झाले दुर्मिळ ग्रामीण जीवनातील वयोवृद्ध महिलांनी जपलेला ठेवा होतोय नामशेष

**कुडूत्री/सुभाष चौगले**

भाजीसाठी पिकवले जाणारे व वेलाला लांबलचक धरणारे सापाच्या आकाराचे पडवळांचे मांडव आपल्या ग्रामिण परसबागेतून नाहीसे होतात की काय असे वाटत आहे.घरातील वयोवृद्ध महिलांनी जपलेली परसबागेतील ही परंपरा आताच्या जमान्यात नाहीसे होते. की काय असेच सध्य स्थितीत वाटत आहे. प्रत्येकाच्या परसात आढळणारी ही बाग दुर्मिळ झाली आहे.

पावसाळ्याच्या दिवसात



परसातील रिकाम्या जागेत ग्रामीण भागातील वयोवृद्ध महीला पडवळ बियांचे रोपटे जतन करून त्याचे एका मांडवावरती ते वाढ करत असत. पूर्ण वाढ झाल्यानंतर त्याला सापाच्या आकाराचे मोठमोठे पडवळ धरली जात. ही परसबाग सर्रास ग्रामीण भागातील प्रत्येकाच्या परड्यात पहायला मिळत असे.लक्ष वेधून घेणारी ही पडवळे घरच्या आहारातील भाजीसाठी वापरात आणली जात. झटक्यात होणाऱ्या भाजीसाठी ही पडवळे उपयुक्त ठरत.

शास्त्रीय नाव ट्रायकोस थस आग्विना असे असून या लांबच लांब पडवळांची भाजी व पानांची भाजी शारीरिक दृष्ट्या अनेक विकारांवर उपयुक्त असून भाजी खूप चविष्ट असते.

काही वर्षांपूर्वी बाजारात भरमसाठ येणारी पडवळे आता मात्र काळाच्या ओघात सुरळत प्रमाणातच दिसत आहेत. जसे दिवस पुढे सरकत आहेत तसतशा काही परंपरा देखील नाहीसे होताना दिसत आहेत. पण जुनं ते सोनं मानून या परंपरा जपून ठेवणे सद्यस्थितीला देखील महत्त्वाचे आहे

# सारथीच्या प्रशिक्षणार्थी विद्यार्थी व पालकांचा अल्टिमेट कम्प्युटरच्या वतीने सत्कार

## नायब तहसीलदार सोनवणे कडून कौतुक

**गेवराई/प्रतिनिधी**

तालुक्यातील संगणक प्रशिक्षण संस्था अल्टिमेट कॉम्प्युटर्सच्या वतीने सारथी योजने अंतर्गत प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा गेवराई तहसीलच्या नायब तहसीलदार संजय सोनवणे साहेब यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

अल्टिमेट कॉम्प्युटर्सच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक दिनानिमित्त छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) मार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचा प्रचार व प्रसार व्हावा म्हणून वरिष्ठांच्या आदेशानुसार छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) ही महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागांतर्गत काम करणारी स्वायत्त संस्था आहे. शिकता शिकता कमवा सारथी मार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी व छत्रपती शिवाजी महाराज यांचा ३५० वा राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त सरसेनापती वीर बाजी पासलकर सारथी संगणक शिकता शिकता कमवा योजना अंतर्गत तालुका स्तरावर व जिल्हा स्तरावर सारथी व MKCL



च्या माध्यमातून या उपक्रमात सहभागी आहेत. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांनी विविध बैठकांमध्ये सारथीच्या उपक्रमाचा प्रसार व प्रसिद्धी देण्याबाबतच्या सूचना सर्व विभागांना दिलेल्या आहेत. याचाच एक भाग म्हणून अल्टिमेट कॉम्प्युटर्सच्या वतीने संचालक नितीन सुरवसे यांनी संगणक प्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचा व त्यांच्या मातांचा नायब तहसीलदार संजय सोनवणे साहेब यांच्या हस्ते सत्कार केला

शिकता शिकता कमवा सारथी मार्फत राबविण्यात येणाऱ्या या योजनेतून विद्यार्थ्यांनी आपापल्या पलकास पहिल्या पगारातून आईसाठी साडी, सासूसाठी साडी, तसेच काही विद्यार्थ्यांनी वडिलांना शेती उपयोगी फवारणी पंप सुध्दा गिफ्ट दिले.

# छत्रपती शाहू महाराज यांच्या १५० व्या जयंती निमित भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने अभिवादन



**बीड/प्रतिनिधी**

भा.बौ.महासभेचे बीड जिल्हा कोषाध्यक्ष अमरसिंह ढाका,वंचित चे नेते बबनराव वडमारे,बसपा नेते प्रशांत वासनिक,बीड तालुकाध्यक्ष यशवंत कदम,सरचिटणीस संदेश डोळस, शहराध्यक्ष ॲड.केतन गायकवाड, सरचिटणीस संतोष जोगदंड, कोषाध्यक्ष दिपक कांबळे, अमोल वडमारे,अजय बाळशंकर, सुयोग ओव्हाळ,देविदास राऊत सर,चक्रे ,वानखेडे दादा, बोराडे साहेब, अर्जुन जवंजाळ साहेब,काशिनाथ वाघमारे, भास्कर सरपते, सरपते ताई, मस्के ताई, वासनिक ताई, ॲड. तेजेस वडमारे, ॲड. सदानंद वाघमारे, सिध्दांत वडमारे ,नितीन प्रधान,नितीन मुजमुले,गौतम कांबळे, संजय सिरसट, रोहन ससाणे,उमेश डोळस, किशोर वडमारे आयु, गणेश शिंदे,सचिन पवार,राजेश मस्के राहुल जावळे, गौतम खेमाडे, गौतम सोनवणे, जितु धन्वे, महादेव शिंदे समता सैनिक आदी उपस्थित होते.

## रासायनिक युक्त दूषित पाण्यामुळे अनेक विविध प्रकारचे मासे मोठ्या प्रमाणात मृत्यूमुखी.

## रासायनिक कंपनीवर कठोर कारवाई करण्याची मागणी



**उरण/विठ्ठल ममताबादे**

पेण तालुक्यातील दादर खाडी येथे रासायनिक युक्त दूषित पाण्यामुळे अनेक विविध प्रकारचे मासे मोठया प्रमाणात मृत्यूमुखी पडत आहेत.गेले दोन ते तीन दिवस मोठ्या प्रमाणात मृत मासे आढळून आले आहेत. पर्यायाने पेण खारपाडा ते उरण गोवठणे पर्यंत याचा दुष्परिणाम मासेमारी करणाऱ्या छोट्या मोठ्या व्यवसायिकांना बसला आहे. सदर घटनेची गंभीर दखल घेऊन कोकण किनारा मच्छिमार संघटनेच्या वतीने नुकसान भरपाई व संबंधित रसायनी पाताळगंगा येथील रासायनिक कंपनी वर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.रायगड जिल्हाधिकारी किसन जावळे यांना यावेळी निवेदन देण्यात आले.कोकण किनारा मच्छिमार संघटनेचे अध्यक्ष संदीप पाटील, सेक्रेटरी दिलीप पाटील, उपाध्यक्ष जयवंत तांडेल, कमिटी सदस्य विनोद पाटील,प्रदीप पाटील, हिरामण पाटील आदी पदाधिकारी सदस्य उपस्थित होते.

# याची देही याची डोळा संत निवृत्ती महाराज पालखी रिंगण सोहळा...

**नासिक/सुरेश इंगळे**

आज सकाळी सिन्नर वासियांचा अल्पोपहार व दुपारी कुंदेवाडीकरांच्या आमरस पुरणपोळीचा आस्वाद घेत संत श्रेष्ठ निवृत्तीनाथांची पालखी हजारो वारकऱ्यांसह दातली येथे आगमन होताच दातलीकरांनी पालखीवर पुष्प वर्षाव आणि फटाक्याची आतिश बाजी केली. संत श्रेष्ठ निवृत्तीनाथ महाराज पालखी दातलीच्या वेशीवर आल्यानंतर भजनी मंडळांनी टाळ मृदंगाच्या गजरात रिंगण सोहळ्याच्या ठिकाणापर्यंत पालखीचे वाजत गाजत स्वागत करत रिंगण सोहळा मैदानावर दाखल झाली. यावेळी जिल्हाभरातून हजारो भाविकांनी सोहळा बघण्यासाठी तुफान गर्दी केली होती .भाविकांनी हा सोहळा याची देही याची डोळा अनुभवला रिंगण सोहळ्यासाठी चार एकर जागेत हा भव्य दिव्य रिंगण सोहळा पार पडला. यावेळी दातली करा कडून रिंगण मैदानावर भव्य रांगोळी व फुलांचा सडा टाकून रिंगण सोहळ्याचे स्वागत केले. रिंगण सोहळा सुरू झाल्यानंतर वायू वेगाने अश्वमेघ धावण्यास सुरुवात झाली. यावेळी भक्ती सागरात बुडालेल्या वारकऱ्यांनी रिंगणामध्ये धाव घेत फेरा पूर्ण केला .यावेळी तालुक्यातील लोकप्रतिनिधी , राजकीय मान्यवर यांनी रिंगण सोहळ्याला भेट देत पालखीचे दर्शन घेतले . यावेळी एमआयडीसी पोलीस स्टेशन कडूनही कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने चोख व्यवस्था करण्यात आली होती . सिन्नर एमआयडीसी व वावी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ अधिकारी, पोलीस सेवक, होमगार्ड , तसेच जिल्हा मुख्यालय यांच्याकडूनही मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता .



# श्री चांगदेव विद्यालयाचा गुणगौरव पुरस्कार सोहळा संपन्न

**पैठण/चैताली औटे**

पैठण तालुक्यातील श्री चांगदेव विद्यालय चांगतपुरी प्रशालेच्या शालांत प्रमाणपत्र परीक्षा देणाऱ्या एस.एस.सी.च्या विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने गुणगौरव सत्कार सोहळा साजरा करण्यात आला.उच्च पदावर निवड झालेल्या यशवंत गुणवंत माजी विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. विद्येची देवता सरस्वती माता व महाराष्ट्राचे कुलदैवत आई तुळजाभवानी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. गुणवंत विद्यार्थिनी कुमारी वैष्णवी बाळासाहेब शिंदे, रेश्मा खरात, भवार साक्षी यांच्यासह आदी विद्यार्थी व त्यांच्या पालकांचा गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला . विविध उच्च पदावर निवड झालेल्या यशवंत गुणवंतांच्या सोहळ्याचेही आयोजन करण्यात आले होते. यामध्ये गणेश नाटकर ,जालिंदर नाटकर, खरात जगदीश, वडघने अविनाश ,हरी नाटकर, संदीपान नाटकर ,दादासाहेब नलभे, प्रवीण खेडेकर, प्रतीक्षा पाखरे ,नाटकर विठाबाई ,नाटकर अश्विनी ,मुक्ता बनगर ,पूजा झारगड सह आदींचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक शिवाजी पवार यांनी केले. प्रास्ताविक मध्ये शाळेची ध्येयधोरणे पुढील शैक्षणिक क्षेत्रामधील नियोजन व शाळेची शिस्त याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी सरपंच साईनाथ होरकटे ,संस्थेचे अध्यक्ष रामनाथ चोरमले ,सचिव सुधीर चोरमले, वैजनाथ मदने, पोलीस पाटील जगन्नाथ माने ,भागिनाथ नाटकर, नितीन मोरे, उपसरपंच शरद झारगड,केंद्र प्रमुख उत्तम खरात, दिलीप थोटे, सुभाष शिंदे, शेषराव नलभे, उत्तमराव नलभे, बाळासाहेब तट्टू, बाबासाहेब होरकटे ,संजय संभाजी वडघणे, चंद्रकांत खरात ,राणी शिंदे ,सरपंच शिवानी पाखरे यांच्या सह विविध क्षेत्रातील मान्यवर पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नगारखाना गेट ते हाफीज खलील चौक पर्यंतचा त्वरित रस्ता दुरुस्त करा काँग्रेसकडून मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

**खुलताबाद/प्रा संजय तुपे**

सध्या पावसाळा सुरु झाला असून शहरातील नगारखाना गेट पासुन ते हाफिज खलील चौक पर्यंतचा रस्ता दुरुस्ती चे काम गेल्या वर्षांपासून प्रलंबित असून पुर्णपणे खराब झालेला असुन खुलताबादकरांसह याठिकाणी येणाऱ्या पर्यटक तसेच भावीकांना ये जा करण्यासाठी खुप नाहक त्रास सहन करावा लागत असून आज दि २५ जुन रोजी कांग्रेस



अल्पसंख्यक विभागचे शहराध्यक्ष इमरान जागीरदार यांच्या वतीने नप मुख्याधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहर काही वर्षांपूर्वी सदरील रस्तेचा काम हे रस्ता कमीत कमी सिमेंट व जास्त खडी वापरुन बनवलेला असून रस्त्यामध्ये खडी उखडत असुन त्यामध्ये येण्या जाण्या शाळेचे मुला/मुली व नागरीकांना हे रस्त्याची खडी मोटर सायकल व चार चाकी गाडीतुन उचलुन एकाद्या मुलाला लागली किंवा नागरीकांना लागेल तर त्यांना इजा होऊ शकते किंवा अपघात होण्याची शक्यता नकाराता येत नाही. त्यामुळे नगारखाना गेट पासुन ते हाफीज खलील चौक पर्यंत रस्ता हे लवकरात लवकर दुरुस्ती करुन देण्यात यावे. या निवेदनावर शेख इकरामोद्दीन, मुजाहिद कुरैशी,मोहम्मद अवेज, शेख इरशाद,सय्यद जाविद, शेख अनीस आदिंची स्वक्षऱ्या आहेत.

## वीज कोसळून तीन महिला ठार. एकाची प्रकृती चिंताजनक



**गेवराई/प्रतिनिधी** गेवराई तालुक्यातील चकलांबा या गावात महिला शेतात खुरपणी करत असताना अचानक वीज कोसळल्याने तीन महिला ठार झाल्या असून एकाची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना बीडच्या शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले आहे. १) विजया राधाकिसन खेडकर वय ४५ वर्ष, २) लंका हरिभाऊ नजन वय ५२ वर्ष, ३) शालन भाई शेषेराव नजन या महिला शेतामध्ये काम करत असताना साडेपाचच्या सुमारास अचानक वीज पडल्याने तिन महिला ठार झाले असून एका महिलेची प्रकृती चिंताजनक आहे.

# विद्यार्थ्यांच्या व शाळेच्या प्रगतीसाठी पालकांचेही सहकार्य महत्त्वाचे-ननवरे सर

## पिंपळवंडी शाळेत गुणवंतांचा सत्कार संपन्न



**पिंपळवंडी/प्रतिनिधी**
विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास आणि जडणघडणीत तसेच शाळेच्या प्रगतीसाठी शिक्षकाप्रमाणे विद्यार्थ्यांच्या पालकांचेही सहकार्य मोलाचे असते असे प्रतिपादन सहशिक्षक कैलास ननवरे सर यांनी केले. पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात इयत्ता ५ वीतील स्कॉलरशिप पात्र गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व पालक मेळावा या कार्यक्रमात पालकांशी संवाद साधताना त्यांनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंचपती निलेश मोरे हे होते,तर प्रमुख पाहुणे म्हणून शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष बिबीशन पवार,उपाध्यक्ष राजेंद्र वाघमारे व केंद्रप्रमुख गोविंद कदम सर तसेच शेख युसुफ सर,पत्रकार बबनराव उकांडे, भाऊसाहेब पवार,कल्याण पवार, ग्रा.पं.सदस्य बद्री पवार,कृष्णा पवार आदी होते. या शाळेतून स्कॉलरशिप परीक्षेला एकूण ७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता.त्यामध्ये कु.वैष्णवी सचिन पवार व कु.ईश्वरी अमोल दगडे या दोन विद्यार्थी पात्र झाल्या.त्यांना शालेय साहित्य व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले व अन्य पाच विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.याप्रसंगी शेख सर,मुख्याध्यापक शहाजी येवले,रमेश पवार सर,ननवरे सर,निलेश मोरे,घोडके मॅडम,क्षिरसागर मॅडम तसेच कल्याण पवार यांनीही मोलाचे मार्गदर्शन भाषणातून करुन ग्रामस्थांनी शाळेच्या प्रगतीसाठी दक्ष राहून माता-पालक यांनी शाळेला सतत भेट देऊन आपल्या पाल्यांच्या प्रगतीचा आलेख तपासला पाहिजे. आई-वडिलांनी आपल्या मुलांचा घरी सुद्धा अभ्यास घेतला पाहिजे. त्यांच्या अडी-अडचणी समजावून घेतल्या पाहिजेत.तसेच येथील जि.प.शाळा अनेक वर्षाची असून १ ली ते ७ वी पर्यंत वर्ग आहेत.ग्रामस्थांनी या शाळेची पटसंख्या टिकून ठेवण्यासाठी प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. वर्षानुवर्ष पटसंख्या वाढण्यापेक्षा कमी होत असल्याची अनेकांनी खंत व्यक्त करून पालक मेळाव्यालाही पालकांना सूचना देऊनही पालक हजर राहत नाहीत ही मोठी शोकांतिका आहे.या पालक मेळाव्याला केवळ बोटावर मोजण्याएवढेच पालक उपस्थित होते. या कार्यक्रमाला संदीप पवार,सुभाष पवार,देविदास पवार आदीसह माता- पालक उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक येवले, सहशिक्षक रमेश पवार,कैलास ननवरे, शिक्षक लोंढे मॅडम,क्षिरसागर मॅडम, नवले मॅडम,घोडके मॅडम यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रमेश पवार यांनी तर आभार क्षिरसागर मॅडम यांनी मानले.

## गुरुनानक प्राथमिक विद्यालयात छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी

**बीड/प्रतिनिधी**
दि २६/०६/२०२४ रोजी गुरुनानक प्राथमिक विद्यालय, शाहूनगर, बीड या शाळेत छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली , जयंती उत्सवाचे अध्यक्ष गुरुनानक प्राथमिक विद्यालयाच्या मुख्याध्यापीका सन्माननीय पवार मॅडम ह्या होत्या तर प्रमुख मार्गदर्शन म्हणून श्रीमती डोंगरे मॅडम व श्री राजेश गदळे सर हे होते, त्यांनी विद्यार्थ्यांना अनमोल मार्गदर्शन केले श्रीमती डोंगरे मॅडम





यांनी शोहू महाराजाविषयीं सखोल मार्गदर्शन केले तर मार्गदर्शन पर भाषणात श्री राजेश गदळे सर यांनी छत्रपती राजर्षी शाहू महाराज यांचा जीवन प्रवास गोष्टी रूपातुन उलगडून सांगीतला व देशासाठी छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी केलेले अनमोल कार्य विद्यार्थ्यांना भाषणातुन पटवून सांगितले, या कार्यक्रमाचे अतिशय सुंदर सुत्रसंचालन व आभार प्रदर्शन सविता मुंडे मॅडम यांनी केले. हा कर्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापीका श्रीमती पवार मॅडम , शाळेतील सहशिक्षक श्री गदळे सर,तांदळे सर,तेलप सर,श्रीमती पव्हणे मॅडम, डोंगरे मॅडम, मुंडे मॅडम, यांनी मोलाचे सहकार्य केले कार्यक्रमाचा समारोप सर्व शिक्षकांना व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून व अल्पोपहार देऊन कर्यक्रमाची सांगता करण्यात आली, यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद व चैतन्य ओसांडून वाहात होता.

## व्यापारी नंदकुमार शेटे यांचे दु:खद निधन



**अंबाजोगाई/प्रतिनिधी**
येथिल नवा मोंढा भागातील जुने व्यापारी नंदकुमार शाहलिंगअप्पा शेटे यांचे मंगळवारी रात्री अकरा वाजता अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. अंबाजोगाई येथील जुने व्यापारी व मंगळवार पेठ येथील नंदकुमार शेटे हे गेल्या अनेक दिवसांपासून आजारी होते.मंगळवारी रात्री अकरा वाजता त्यानेदु:खद निधन झाले आहे. दि.२६ जून बुधवार रोजी दुपारी दोन वाजता लिंगायत स्मशानभूमी सकलेश्वर मंदिर, बाराखंबी परिसर येथे त्यांच्यावर अंत्यविधी आला. यावेळी शहरातील राजकिय नेते,पदाधिकारी,व्यापारी, नागरिक, समाज बांधव उपस्थित होते. नंदकुमार शेटे यांच्या पश्चात दोन मुले,विवाहित मुलगी,सुना नातवंडे असा परिवार आहे.

# डोंगरेश्वर संस्थान ते पंढरपूर वै.महंत रामदास बाबा पायी दिंडीचे प्रस्थान ५ जुलै रोजी होणार..

## चला पंढरीसी जाऊ रखुमा देवीवरा पाहू या नामात दंगणार पांडुरंगाचे भक्त

**वडवणी/प्रतिनिधी**
श्री क्षेत्र डोंगरेश्वर संस्थान करंजवण येथील रामदास बाबा पायी दिंडी सोहळा सोहळ्याचे प्रस्थान ५ जुलै २०२४ वार शुक्रवार रोजी होणार आहे. या पायी दिंडीचे आयोजन ह.भ.प.वै.महंत रामदास बाबा सद्गुरू भगवान बाबा,वामन भाऊ,भिमसिंह बाबा, काशीगिरी बाबा,यांच्या कृपाशीर्वादाने गेल्या अनेक वर्षापासून होत आहे.तरी समस्त भाविकांनी व संस्थान च्या भक्त परिवारातील भाविकांनी डोंगरेश्वर संस्थान ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्यात जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे अशी ह.भ.प.महंत पांडुरंग महाराज शास्त्री गुरु रामदास बाबा ..यांच्या कडून सर्व भक्त परिवाराला विनंती... आषाढी वारी म्हणलं की, वारकऱ्यांना वेगळीच उत्सुकता लागलेली असते. या वारीचा आनंद घेण्यासाठी आणि पांडुरंगाचा आशीर्वाद घेण्यासाठी भक्त वर्षभर आतुरतेने वाट पाहत असतात .खरंच हा दिंडी सोहळ्यातील आनंद खूपच वेगळा असतो .काही दिवसांपूर्वीच शेतकरी राज्याचे शेतीतील पेरणी ची कामे



पुर्ण पणे झालेली आहेत .दरवर्षी शेतकरी राजा पांडुरंगा कडे काही तर साकडं घालत असतो काही तरी मागत असतो. अणि याच दृष्टीने टाळ मृदंगाच्या गजरात पंढरीचे वारकरी भक्त पंढरीच्या वाटेने दंग होतात. बीड जिल्ह्यातील डोंगरेश्वर संस्थान येथील ह.भ.प.वै.महंत रामदास बाबा यांच्या नेतृत्वाखाली गेल्या अनेक वर्षापासून पंढरी चा पायी दिंडी सोहळा निर्विघ्न पणे पार पडत होता. आता संस्थान चे उत्तराधिकारी श्री. ह. भ. प.महंत पांडुरंग महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र डोंगरेश्वर संस्थान ते पंढरपूर पायी दिंडी सोहळा पुढील मार्गे दिनांक. ५ जुलै २०२४ रोजी संस्थान वरुण पुढील मार्गे रवाना होईल. सोनेगाव, निपाणी, पाथरूड, इडापिडा, रुई, ढगपिंपरी, शिराळा, लवूळ, रानमळा,आणि मेंढापूर मुक्कामानंतर पंढरपूर नगरीत दिंडीचे आगमन होते. या मार्गेचा दिंडी प्रवासा १० दिवसांचा असतो.पायी दिंडी सोहळ्यात भावीक भक्तांचा दरवर्षी उदंड प्रतिसाद मिळत आहे तसेच ब्राह्मणगाव, मूर्ती, भीमसिंह गड वडवणी अणि तांदळवाडी येथील दिंड्या श्री क्षेत्र डोंगरेश्वर संस्थान पायी दिंडी सोहळ्यात सामील होतील.या सोहळ्या दरम्यान दररोज विविध धार्मिक कार्यक्रमांचे ही आयोजन करण्यात येते. दररोज भाविक पायी दिंडी सोहळ्याला जेवणाच्या पंगती देतात अन्नदानाचा महायज्ञ सुरू ठेवतात. यावर्षी हा पालखी सोहळा प्रस्थान दि.५ जुलै २०२४ ला सुरू होऊन श्री क्षेत्र पंढरपूर येथे १५ जुलै २०२४ रोजी सोमवारी पोहचणार आहे.श्री क्षेत्र पंढरपूर येथे दिंडी थांबण्याचे ठिकाण वै महंत रामदास बाबा मठ शेगाव ( दु ) रोड पाण्याच्या टाकीजवळ पंढरपूर..... व श्री क्षेत्र पंढरपूर मध्ये पौर्णिमेपर्यंत दिंडी थांबेल व पौर्णिमेला काला करून परतीचा प्रवास सुरू होईल. आणि श्री क्षेत्र डोंगरेश्वर संस्थान करंजवण येथे दिंडीची सांगता होईल या पायी दिंडी सोहळ्यात सर्व भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे अशी विनंती ह.भ.प. महंत पांडुरंग महाराज शास्त्री (डोंगरेश्वर संस्थान देवदरा ) यांनी केली आहे..

दैनिक वादळ वार्तांहे पत्र मद्रकग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथनूडिजिटल छापन संप ादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 के ज येथन तू यांच्या ऑफिस वरून बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरूपात प्रकाशित के ले आहे ( वाद के ज / बीड न्यायालय अंतर्गत )